या समवेतः- गुरुवार दिनांक- ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. प्राप्त झालेल्या अहमदनगर जिल्हा परिषदेच्या,स्थायी समिती सभेचे कामकाज कार्यवृत्त जोडले आहे.

---

अहमदनगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
क्र.साप्रवि-१/परिषद/स्थायी सभा/१६७/२०२४
अहमदनगर, दिनांक १३/०३/२०२४

प्रत माहितीसाठी सादर,

१. मा.प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,अहमदनगर
२. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,अहमदनगर
३. मा.प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामिण विकास यंत्रणा,अहमदनगर
४. खाते प्रमुख सर्व

२/-आपल्या खात्यासंबंधी विषय व त्याबाबतचे ठरावासंबंधी, तसेच सभेमध्ये झालेल्या चर्चेत उपस्थित केलेल्या प्रत्येक मुददयावर उचित कार्यवाही करुन त्याचा अनुपालनचा लेखी अहवाल सामान्य प्रशासन विभागास त्वरीत पाठवावा,म्हणजे पुढील स्थायी समिती सभेस अनुपालन सादर करता येईल.

(राहुल शेळके)
सचिव,स्थायी समिती सभा तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद,अहमदनगर.

स्थायी समिती सभा गुरुवार दिनांक ०७/०३/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. सभेचे कार्यवृत्त

**हजर अधिकारी**

| अ.क्र. | नाव | अ.क्र | नाव |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री आशिष येरेकर<br>प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी | २ | मा.श्री.संभाजी लांगोरे<br>अति.मुख्य कार्यकारी अधिकारी |
| ३ | श्री.राहुल शेळके सचिव स्थायी समिती<br>तथा,उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्रवि) | ४ | श्री.शैलेश मोरे<br>मुख्य लेखा व वित्त अधिकारी |
| ५ | श्री दादाभाऊ गुंजाळ<br>उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(ग्रा.पं.) | ६ | श्री.समर्थ शेवाळे<br>प्रकल्प संचालक जलजीवन मिशन |
| ७ | श्री मनोज ससे<br>जिल्हा कार्यक्रम अधिकारी (मबाक) | ८ | श्री.वंदेश उराडे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.दक्षिण) |
| ९ | श्री.संजय शेवाळे<br>कार्यकारी अभियंता (सा.बां.उत्तर) | १० | श्री.दिलीप सोनकुसळे<br>प्र.उपजिल्हा कार्यक्रम समन्वयक<br>(मग्रारोहयो) |
| ११ | श्री.पाडुरंग गायसमुद्रे<br>जिल्हा जलसंधारण अधिकारी (ल.पा) | १२ | श्री.श्रीरंग गडदे<br>प्र.कार्यकारी अभियंता,(ग्रा.पा.पु.) |
| १३ | श्री निलेश कानवडे<br>कृषि विकास अधिकारी | १४ | डॉ.श्री दशरथ दिघे<br>जिल्हा पशुसवंर्धन अधिकारी |
| १५ | डॉ.श्री बापूसाहेब नागरगोजे<br>जिल्हा आरोग्य अधिकारी | १६ | श्री.भास्कर पाटील<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक) |
| १७ | श्री.अशोक कडूस<br>शिक्षणाधिकारी (माध्यमिक) | १८ | श्री राधाकिसन देवढे<br>प्र.जिल्हा समाज कल्याण अधिकारी |
| १९ | श्री राजु लाकुडझोडे<br>उपमुख्य लेखा व वित्त अधिकारी | २० | श्री. निखिल पठारे<br>प्र.उप अभियंता (भु.स.वि.यो.) |

**<u>विषय क्रमांक १</u>**:- दि.०९/०२/२०२४ रोजीची स्थायी सभा पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत वाचुन कायम करणे .

**<u>ठराव क्र.७९</u>**:- दि.०९/०२/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा.पुर्ण झालेल्या सभेचे इतिवृत कायम करणे व मंजूर ठरावावर संबंधित खात्याने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेणेत येऊन त्यावर महत्वाचे कार्यवाहीच्या मुद्यावर संबंधित विभागाने केलेल्या कार्यवाहीचा आढावा घेऊन त्यांची नोंद घेणेत आली.संबंधित सर्व खातेप्रमुखांनी सभेतील कामकाजानुसार तातडीने उचित कार्यवाही करुन अनुपालन सादर करावे.

**<u>विषय क्रमांक२</u>**:-जिल्हा परिषद अधिनिस्त असलेली निरुपयोगी मोटार वाहने / यंत्र सामुग्री च्या जाहीर ई-निविदा मागवुन आलेल्या ई - निविदेस लिलाव समितीने स्विकृत केलेल्या किंमती निरुपयोगी मोटार वाहने व यंत्र सामुग्री यांच्या निर्लेखनास स्थायी समिती सल्लागार समिती सभेपुढे ठेवावयाचा विषय.

प्रस्तावना -

जिल्हा परिषद अहमदनगर च्या अधिनिस्त असलेल्या विविध विभागाकडील निर्लेखनास पात्र जुनी निरुपयोगी मोटार वाहने / यंत्रसामुग्री च्या निर्लेखन प्रस्तावास मान्यता देण्यासाठी त्याचप्रमाणे नव्याने निर्लेखन करणेसाठी जमा झालेली मोटार वाहने व यंत्रसामुग्री लिलाव समितीने शिफारस / मान्यता घेण्यासाठी शासन निर्णय क्र. जेईपी-१०९६ / सी.आर -३५८८ / २६ मंत्रालय, मुंबई दिनांक २२ नोव्हेंबर २००० नुसार सुचीत केलेप्रमाणे गठीत करण्यात आलेल्या लिलाव समितीची बैठक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प.अ.नगर यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०८/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तसेच दिनांक २०/०४/२०२३ रोजी १२.३० वाजता मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे दालन, जिल्हा परिषद, अ.नगर येथे घेण्यात आली.

दिनांक ०७/१२/२०२३ ते १३/१२/२०२३, दि. १३/१२/२०२३ ते १८/१२/२०२३ तसेच १८/१२/२०२३ ते २१/१२/२०२३ अशा तारखेनुसार एकुण ९ निविदा प्रसिध्द करण्यात आल्या. त्यापैकी ७ लॉटसला तिस-या मुदतवाढ अखेर निविदा प्राप्त झाले तर २ लॉटसला काहीच प्रतिसाद मिळाला नाही.

१) ७ लॉटसला निविदा प्राप्त झाल्यामुळे त्या निविदांचा आर्थिक लिफाफा ( एग्र ) उघडणेत आल्या आहेत. ०७ पैकी २ टेंडर आयडी लॉटस च्या स्विकृत किंमती हया निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा जास्त असल्याने लिलावसमितीने स्विकृत केल्या आहेत. तसेच ५ लॉटसच्या किंमती निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा कमी असल्याने त्या अस्विकृत करून फेरनिविदा करुन निकाली काढावयाच्या आहेत. (प्रपत्र क्र. - १)
२) तसेच उर्वरित २ लॉटसला एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे त्या २ निविदा आय.डी. रध्द करुन त्यांच्या फेरनिविदा करुन निकाली काढायच्या आहेत. माहिती खालील प्रपत्रात सादर केली आहे. (प्रपत्र क्र. - २)

(१) निर्धारीत वाजवी किंमतीपेक्षा जास्त दराच्या प्रस्तुत किंमती लिलाव समितीने स्विकृत / अस्विकृत करुन त्यास मान्यता प्रदान केलेली आहे त्यास स्थायी समिती सल्लागार समितीच्या मान्यतेस्तव सादर. (प्रपत्र १), (प्रपत्र २)

| तक्ता प्रपत्र क्रमांक १ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | यंत्र सामुग्री / मोटार वाहनांचा प्रकार | टेंडर आय.डी. | वाजवी किंमत रु. | निविदा धारकाचे नांव | निविदा नुसार प्राप्त किंमत रु. | शेरा |
| १ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-377 | 2023_AHMED_969444_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ९१०००.०० | अस्विकृत |
| २ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-381 | 2023_AHMED_969470_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ८१०१० | अस्विकृत |
| ३ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-382 | 2023_AHMED_969475_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ९१०१०.०० | अस्विकृत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ४ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-383 | 2023_AHMED_969482_1 | १२७०९३.०० | उदय ट्रॅव्हल्स | १३६३००.०० | स्विकृत |
| ५ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-460 | 2023_AHMED_969524_1 | १४८२७६.०० | गोल्डन स्क्रॅप | ८१०१०.०० | अस्विकृत |
| ६ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-462 | 2023_AHMED_969541_1 | १४८२७६.०० | शिवाजी बाळासाहेब लोंढे | ९१०००.०० | अस्विकृत |
| ७ | टाटा मांझा पेट्रोल कार MH16-N-2222 | 2023_AHMED_969565_1 | १४०००० .०० | शिवाजी बाळासाहेब लोंढे | १४१०००.०० | स्विकृत |

१) वरील तक्ता प्रपत्र क्रमांक १ मध्ये अनुक्रमांक १ ते ७ मधील टेंडर आय.डी.क्र. ९६९४८२ आणि ९६९५६५ च्या नमुद किंमती निर्धारित वाजवी किंमती पेक्षा जास्त असल्याने लॉट स्विकृतीस पात्र आहे. त्यामुळे सदर निविदा मंजुर करुन सदर लॉटची विक्री करणे तसेच टेंडर आय.डी.क्र. ९६९४४४, ९६९४७०, ९६९४७५, ९६९५२४, ९६९५४१ च्या नमुद किंमती निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा खुप कमी असल्याने लॉट अपात्र आहे त्यामुळे ती निविदा अस्विकृत करुन निविदा फेरनिविदा करण्यास सदर विषय स्थायी समिती सल्लागार समिती समोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

| तक्ता प्रपत्र क्रमांक २ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | यंत्र सामुग्री / मोटार वाहनांचा प्रकार | टेंडर आय.डी. | वाजवी किंमत रु. | निविदा धारकाचे नांव | निविदा नुसार प्राप्त किंमत रु. | शेरा |
| १ | जुने निकामी ऑटोमोबाईल स्क्रॅप (लॉट) | 2023_AHMED_969549_1 | ५०००.०० | एकही निविदा प्राप्त नाही | निविदा अप्राप्त | फेर निविदा |
| २ | जुनी निरुपयोगी झेरॉक्स मशीन (रिको कंपनी) | 2023_AHMED_969558_1 | ४०००.०० | एकही निविदा प्राप्त नाही | निविदा अप्राप्त | फेर निविदा |

२) तसेच तक्ता प्रपत्र क्र. २ मध्ये अनुक्रमांक १ व २ मधील टेंडर आय.डी.क्र. ९६९५४९, ९६९५५८ या २ निविदांना प्रतिसाद न मिळाल्यामुळे सदरचे निविदा रद्द करुन नव्याने फेरनिविदा प्रसिध्द करण्यास सदर विषय स्थायी समिती सल्लगार समिती सभेसमोर मान्यतेस्तव सादर करण्यात येत आहे.

नियमातील तरतुदी :-

१.शासन निर्णय क्रमांक जेइपी १०९०/सी.आर ४५१८/२६ ग्रामिण विकास विभाग मंत्रालय, मुंबई दि.२३ नोव्हेंबर १९९० व शासन निर्णय क्र.जेईपी १०९६ /सी.आर३५८८/२६ दिनांक २२ नोव्हेंबर २००० ग्रामविकास व जलसंधारण विभागानुसार जिल्हा परिषदेकडील यंत्रसामुग्री / वाहन व इतर साहित्याच्या लिलावासाठी जरी याद्वारे अधिकृत लिलावदाराची नेमणूक करण्यात आलेली असली तरीसुध्दा सदर साहित्याची इतर

लिलावादारा मार्फत किंवा इतर मार्गाने सोईस्कर विक्री करण्याचा अधिकार संबंधीत जिल्हा परिषदेस असलेने लिलाव प्रक्रिया राबवितांना जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन लिलाव साहित्यास निर्धारित वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत मिळणेबाबत विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. त्यादृष्टीने जाहीर ई - निविदेद्वारे (ऑनलाईन ई - टेंडर लिलाव) याबाबतचे दर मागवून जास्तीत जास्त प्रसिध्दी देऊन वाजवी किंमतीपेक्षा जास्त किंमत येईल अशा पध्दतीने अटी शर्तीसह तात्काळ ई - लिलाव प्रक्रिया करुन विक्री करणेबाबतचे सर्व अधिकार उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील पत्र क्र. झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१ दिनांक अन्वये असाधारण राजपत्र क्र. २६ दि. ११ मार्च २०२२ नुसार प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली असुन त्याचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अहमदनगर यांना दिलेले आहेत.

विभागाचे अभिप्राय :- प्रस्तावनेतील १, व २ नुसार नमुद केलेप्रमाणे कार्यवाही करणेत यावे. स्विकृत किमतीस निविदाधारकाला विकणेस तसेच प्रतिसाद न मिळालेली यंत्रसामुग्री / मोटार वाहनांची फेरनिविदा काढून निकाली काढण्यास मान्यता मिळावी.

**ठराव क्र८०:-** जिल्हा परिषद अधिनिस्त असलेली निरुपयोगी मोटार वाहने / यंत्र सामुग्री च्या जाहीर ई - निविदा मागवुन आलेल्या ई - निविदेस लिलाव समितीने स्विकृत केलेल्या किंमती निरुपयोगी मोटार वाहने व यंत्र सामुग्री यांच्या निर्लेखनास स्थायी समिती सल्लागार समिती या ठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

(प्रपत्र १) व (प्रपत्र २)

| तक्ता प्रपत्र क्रमांक १ | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | यंत्र सामुग्री / मोटार वाहनांचा प्रकार | टेंडर आय.डी. | वाजवी किंमत रु. | निविदा धारकाचे नांव | निविदा नुसार प्राप्त किंमत रु. | शेरा |
| १ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-377 | 2023_AHMED_969444_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ९१०००.०० | अस्विकृत |
| २ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-381 | 2023_AHMED_969470_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ८१०१० | अस्विकृत |
| ३ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-382 | 2023_AHMED_969475_1 | १२७०९३.०० | गोल्डन स्क्रॅप | ९१०१०.०० | अस्विकृत |
| ४ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-383 | 2023_AHMED_969482_1 | १२७०९३.०० | उदय ट्रॅव्हल्स | १३६३००.०० | स्विकृत |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| ५ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-460 | 2023_AHMED_969524_1 | १४८२७६.०० | गोल्डन स्क्रॅप | ८१०१०.०० | अस्विकृत |
| ६ | महिंद्रा अँड महिंद्रा डिझेल जीप बोलेरो MH16-N-462 | 2023_AHMED_969541_1 | १४८२७६.०० | शिवाजी बाळासाहेब लोंढे | ९१०००.०० | अस्विकृत |
| ७ | टाटा मांझा पेट्रोल कार MH16-N-2222 | 2023_AHMED_969565_1 | १४०००० .०० | शिवाजी बाळासाहेब लोंढे | १४१०००.०० | स्विकृत |

तक्ता प्रपत्र क्रमांक २

| अ. क्र. | यंत्र सामुग्री / मोटार वाहनांचा प्रकार | टेंडर आय.डी. | वाजवी किंमत रु. | निविदा धारकाचे नांव | निविदा नुसार प्राप्त किंमत रु. | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | जुने निकामी ऑटोमोबाईल स्क्रॅप (लॉट) | 2023_AHMED_969549_1 | ५०००.०० | एकही निविदा प्राप्त नाही | निविदा अप्राप्त | फेर निविदा |
| २ | जुनी निरुपयोगी झेरॉक्स मशीन (रिको कंपनी) | 2023_AHMED_969558_1 | ४०००.०० | एकही निविदा प्राप्त नाही | निविदा अप्राप्त | फेर निविदा |

मा. उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, यांचेकडील पत्र क्र. झेपीए-२०२२/प्र.क्र.२५/पंरा-१ दिनांक अन्वये असाधारण राजपत्र क्र. २६ दि. ११ मार्च २०२२ नुसार प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आली असुन जि.प. स्थायी समितीचे अधिकार प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अहमदनगर यांना प्राप्त झाल्याने लिलावसमितीने स्विकृत केलेल्या किंमतीस निरुपयोगी मोटार वाहने व यंत्र सामुग्री यांच्या निर्लेखनास याठरावाद्वारे मान्यता देण्यात येत आहे.

सचिव तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी,(सा.)
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रशासक तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहमदनगर